# मानव विकास कार्यक्रम, परभणी

**जाहीरात क्र.2014 /शिवि/माविका/पदभरती-2014 सिआर-1 शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.परभणी दि. 03.07.2014**

महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक माविम/2010 प्र.क्र.-81/का-141 दि. 19.07.2011, शासन निर्णय क्र. माविका/2014/प्र.क्र.50/का-141 दि. 12.05.2014, शासन निर्णय क्र. एसएसएन 2102/144/02/ माशि-2 मंत्रालय, मुंबई दि. 20 मे 2004 व शासन निर्णय क्र. माविका-2014/प्र.क्र.16/का-1418 दि. 28.02.2014 अन्वये परभणी जिल्ह्यातील सर्व 09 तालुक्यामध्ये मानव विकास कार्यक्रम योजना सुरू आहे. सदर योजनेमध्ये शिक्षण या योजनेंतर्गत इ. 10 व 12 वी मध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष शिकवणी वर्ग सुरू करणे ही योजना राबविण्यासाठी जिल्हा निवड समिती, परभणी मार्फत खालील नमुद केलेल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडुन संपूर्णतः तात्पुरत्या स्वरुपात 3 महिन्याच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकत्रित परिश्रमिकांवर भरावयाची आहेत. करिता जिल्हा निवड समितीमार्फत या जाहिरातीद्वारे विहीत नमुन्यातील Online अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जदाराने Online अर्ज भरतांना वस्तुनिष्ठ व अचुक माहिती भरावी तसेच Online अर्जासोबत कोणतेही प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे (UPLOAD) करु नयेत. Online भरलेल्या माहितीच्या आधारे (मुळ कागदपत्रे तपासणीच्या अधिन राहुन) उमेदवारांची निवड करण्यात येईल. तसेच निवड केल्यानंतर माहिती चुकीची/खोटी/दिशाभुल करणारी आढळल्यास, त्यांची निवड रद्द करण्यात येईल व पुढील गूणानुक्रमे असलेल्या उमेदवारांस संधी देण्यात येईल. तसेच Online अर्ज करतांना आपल्या सर्व शैक्षणीक व इतर बार्बीची पूर्ण माहिती नमुद करावी. Online भरलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्रे/कागदपत्रे नंतर कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

## भरावयाच्या पदाचा तपशिल

| अ. क्र. | पदाचे नांव | विषय | पदसंख्या | शैक्षणीक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **हंगामी शिक्षक इ. 10 वी** | **इंग्रजी, गणित, विज्ञान** | **परभणी - 63**<br>**पूर्णा -20 गंगाखेड - 32**<br>**पालम - 19 सोनपेठ - 15**<br>**जिंतूर - 30 पाथरी - 16**<br>**मानवत - 20 सेलू - 16**<br>**एकूण - 231** | **बी.ए. इंग्रजी / बी.एस्सी. गणित, विज्ञान (जिवशास्त्र / रसायनशास्त्र / भौतिकशास्त्र) बी.एड्. पदव्यूत्तर पदवी असल्यास प्राधान्य** | **तीन महिन्याच्या कालावधीसाठी रू. 10000/- एकत्रित मानधन व उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार प्रति विद्यार्थी 1000/-** |
| 2 | **हंगामी शिक्षक इ. 12 वी** | **इंग्रजी, गणित, जीवशास्त्र, भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र, अकाऊंट्स** | **परभणी - 30**<br>**पूर्णा -10 गंगाखेड - 19**<br>**पालम - 07 सोनपेठ - 04**<br>**जिंतूर - 09 पाथरी - 04**<br>**मानवत - 07 सेलू - 04**<br>**एकूण - 94** | **एम.ए. इंग्रजी / एम.एस्सी. जीवशास्त्र, भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र / एम.कॉम. अकाऊंट / बी.एड्.** | |

**उपरोक्त नमूद पदांची संख्या ही अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणानुसार व प्रत्यक्ष नोंदणीनुसार कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.**

## पात्रतेच्या अटी :-

### शैक्षणिक अर्हता

| पदाचे नांव | विषय | शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|
| **हंगामी शिक्षक इ. 10 वी** | **इंग्रजी, गणित, विज्ञान** | **बी.ए./बी.एस्सी., बी.एड्.** (शासन निर्णय क्र. एसएसएन 2102/144/02/ माशि-2 मंत्रालय, मुंबई दि. 20 मे 2004) |
| **हंगामी शिक्षक इ. 12 वी** | **इंग्रजी, गणित, जीवशास्त्र, भौतीकशास्त्र, रसायनशास्त्र, अकाऊंट्स** | **एम.ए./एम.एस्सी./एम.कॉम.,बी.एड्.** (शासन निर्णय क्र. एसएसएन 2102/144/02/ माशि-2 मंत्रालय, मुंबई दि. 20 मे 2004) |

## वयोमर्यादा :-

जाहीरातीत नमुद **हंगामी शिक्षक (इ. 10 वी साठी) व हंगामी शिक्षक (इ. 12 वी साठी)** या पदा करीता **दिनांक 01.06.2014** रोजी किमान 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

## अटी व शर्ती :-

1. सदरील पदांसाठी देण्यात येणारे एकत्रित मानधन हे प्रत्यक्ष वर्ग सुरू झाल्यापासूनच देय राहिल.
2. सदर नेमणुका ह्या निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाच्या 3 महिन्यांच्या कालावधी करिता एकत्रित परिश्रमिकांवर राहतील. त्यामुळे 3 महिन्याच्या कालावधीनंतर सदर पदावर कोणताही अधिकार राहणार नाही.
3. **हंगामी शिक्षक (इ. 10 वी साठी) व हंगामी शिक्षक (इ. 12 वी साठी)** पदासाठी 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल. परिक्षेला मराठी, इंग्रजी , सामान्य ज्ञान व बुद्धीमत्ता चाचणी या विषयावर प्रत्येकी 50 गुण याप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरुप राहील. लेखी परिक्षेतील प्राप्त गुणवत्तेनुसार निवड यादी तयार करण्यांत येईल.
4. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा (अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)
5. **ज्या तालुक्यातील पदासाठी अर्ज सादर केला आहे, त्या तालुक्याचा रहिवासी असणे बंधनकारक राहिल.**
6. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदाची संख्या, परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवलेले आहे. याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.
7. लेखी परिक्षेत प्राप्त गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल व निवड केलेल्या उमेदवारांचे कागदपत्रे पडताळणी नंतर अंतीम निवड करण्यात येईल.
8. उमेदवारांना परिक्षेस येण्या-जाण्याचा प्रवासखर्च दिला जाणार नाही.
9. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
10. सदर पदांसाठी विहित केलेल्या नमुन्यात उमेदवारास Online अर्ज सादर करावे लागेल. Online अर्ज सादर करतांना उमेदवाराने **हंगामी शिक्षक (इ. 10 वी साठी)** किंवा **हंगामी शिक्षक (इ. 12 वी साठी)** पदास अर्ज केला हे स्पष्ठ नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर परिक्षा हया एकाच दिवशी व एकाच वेळी घेण्यात येणार आहेत त्यामुळे सदर दोन पदापैकी कोणत्याही एकाच पदास अर्ज करावा.

11. **हंगामी शिक्षक (इ. 10 वी साठी)** व **हंगामी शिक्षक (इ. 12 वी साठी)** या पदावर उमेदवारांची निवड लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यांत येईल. पदाची उपलब्ध संख्या व लेखी परिक्षेत समान गुण धारण करणाऱ्या उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णयात दिलेल्या सुचनांच्या अधिन राहून निवड केल्या जाईल.

12. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/ अगर खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल.या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.उमेदवारास परिक्षेस दिला जाणारा प्रवेश हा उमेदवाराने online अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे देण्यात येत आहे. मूळ कागदपत्र तपासणीच्यावेळी अर्जातील माहिती व मूळ कागदपत्रे यात तफावत आढळून आल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

13. लेखी परिक्षेत पात्र ठरुन निवड झालेल्या उमेदवाराची यादी परिक्षा झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी / जिल्हा परिषद, परभणी येथील नोटीस बोर्डवर तसेच www.parbhani.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

14. उमेदवाराने त्यांच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल.

## अर्ज कसा करावा :-

1) उमेदवाराची माहिती संगणकावर एकत्रित करण्यांत येणार आहे. परिक्षेसाठी विहित केलेला अर्ज ww.parbhani.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.त्यावर असलेल्या अर्जात माहिती भरुन सादर करावा, व प्रिंट आऊट काढून घ्यावी.

2) उमेदवाराला कोणत्याही वेब सेंटरवर किंवा उपलब्ध असलेल्या कोणत्याही इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरुन अर्ज भरता येईल.

3) परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारांस www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. परिक्षा प्रवेशपत्र आवेदन अर्ज स्विकारण्यांच्या अंतीम दिनांकानंतर उपलब्ध होईल.

* परीक्षा प्रवेश व परिक्षेविषयी इतर माहिती ही www.parbhani.nic.in वर उपलब्ध राहील.

* **गुणानुक्रमे लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या व निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्राची तपासणीचे वेळी खालील प्रमाणे दस्तऐवज सादर करावे लागतील.**

1) शैक्षणीक अर्हतेचे मुळ प्रमाणपत्र (गुणपत्रिका) 10 वी / 12 वी /पदवी /पदव्युत्तर.
2) वयासबंधी दाखला. (जन्माचा दाखला / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र )
3) अधिवास प्रमाणपत्र. (ज्या तालुक्यातील रिक्त पदांसाठी अर्ज केला असेल, त्या तालुक्यातील तहसीलदार यांनी निर्गमीत केलेले असावे.)

## अर्ज स्विकृती अंतिम दिनांक

**हंगामी शिक्षक (इ. 10 वी साठी)** व **हंगामी शिक्षक (इ. 12 वी साठी) या पदासाठी विहित नमून्यातील ऑनलाईन आवेदनपत्र दिनांक 04.07.2014 पासून दिनांक 12.07.2014 पावेतो स्विकृत करण्यात येतील. विहित मूदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

## परीक्षा शुल्क

परिक्षा शुल्क **रु. 100/-** अर्जासोबत भरावयाचे आहे. सदरचे परिक्षा शुल्क बँक चालान च्या स्वरुपात जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती परभणी यांचे नावाने स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कुठल्याही शाखेत चालानव्दारे **चालू खाते क्रमांक 33834199842** वर जमा करणे आवश्यक आहे. तसेच भारतीय स्टेट बँकेच्या (https://www.onlinesbi.com/prelogin/collecthome.htm) या संकेतस्थळावर शुल्क भरता येईल.

या व्यतिरिक्त डि.डि.(धनाकर्ष)/ धनादेश /इंडियन पोस्टल ऑर्डर इत्यादी कोणत्याही माध्यमाव्दारे शुल्क स्विकारले जाणार नाही. अर्जदाराने अर्ज भरतांना आपला Journal No अत्यंत काळजीपूर्वक, अचूकरित्या भरावा. सदर क्रमांक चुकीचा टाकल्यास आपला अर्ज रदद होईल. चालान / इंटरनेटव्दारे भरलेल्या शुल्काची पावती मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहिल. सदर परिक्षा शुल्क ना परतावा राहिल. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही.

## परीक्षा पद्धती

शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दि. 19.10.2007 नुसार जिल्हा निवड समिती, परभणी यांचे दिनांक 30.06.2014 रोजीचे बैठकीत सर्वानुमते असे ठरले की, उपरोक्त भरतीप्रक्रीयेची सर्व कार्यवाही जिल्हा सेतू समिती, परभणी मार्फत पूर्ण करण्यात येईल.

## भरतीबाबत इतर आवश्यक सुचना :-

1) **आवेदनपत्र स्विकृत / अस्विकृत करण्यास निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल, तसेच अंतीम निर्णय इत्यादी बाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती / नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.**

2) विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, ज्या तालुक्यासाठी अर्ज सादर केला आहे त्या तालुक्याचे रहिवासी प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज, विहीत नमुण्यात नसलेले अर्ज, मजकुर अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज व स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले व फोटो नसलेले अर्ज, विहीत कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज याप्रमाणे इतर उणीवा असलेले अर्ज नाकारण्यात येईल.

3) **हंगामी शिक्षक (इ. 10 वी साठी)** किंवा **हंगामी शिक्षक (इ. 12 वी साठी)** अपात्र उमेदवाराची यादी दि.13.07.2014 रोजी www.parbhani.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उमेदवारानी दि.15.07.2014 पर्यंत त्रुटीची पूर्तता करावी. दि. 17.07.2014 रोजी अंतीम पात्र /अपात्र यादी प्रसिध्द करण्यात येईल.

4) **लेखी परीक्षेची संभाव्य तारीख : 20.07.2014**

**दिनांक :- 03.07.2014**
**ठिकाण :- परभणी**

*स्वाक्षरीत/-*
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. तथा**
**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती, परभणी**

*स्वाक्षरीत/-*
**जिल्हाधिकारी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, परभणी**